RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक २२] शनिवार, एप्रिल २०, २०१३/चैत्र ३०, शके १९३५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ५७

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० एप्रिल २०१३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२.**

क्रमांक स्वयंअ-२०१३/ (६७/१३)/ माशि-१.—महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (२०१३ चा महाराष्ट्र १) याच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) यासह कलम २३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे, जे उक्त अधिनियमाच्या कलम २३ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

१. **संक्षिप्त नाव.**— या नियमांना महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन), छाननी समिती स्थापना नियम, २०१३ असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " - याचा अर्थ, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (२०१३ चा महाराष्ट्र १) असा आहे ;

(ख) " अध्यक्ष " - याचा अर्थ, छाननी समितीचा अध्यक्ष, असा आहे ;

(ग) " उप संचालक " - याचा अर्थ, शालेय शिक्षण विभागाचे विभागीय उप संचालक, असा आहे ;

(घ) " उप शिक्षणाधिकारी " - याचा अर्थ, जिल्हा उप शिक्षणाधिकारी, असा आहे ;

(ङ) " शासन " किंवा " राज्य शासन " - याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(च) " बैठक " - याचा अर्थ, छाननी समितीची बैठक असा आहे ;

(छ) " सदस्य " - याचा अर्थ, अध्यक्ष आणि सदस्य-सचिव यांसह छाननी समितीचे सदस्य, असा आहे ;

(ज) " सदस्य-सचिव " - याचा अर्थ, छाननी समितीचा सदस्य-सचिव, असा आहे ;

(२) या नियमात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमामध्ये त्यांना नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील.

**३. अध्यक्ष व सदस्य यांची अर्हता.**—(१) छाननी समितीचा अध्यक्ष हा, विभागीय शिक्षण उप संचालक असेल व छाननी समितीचा सदस्य-सचिव हा, उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) असेल.

(२) सदस्य हा, शिक्षण विभागातील शिक्षणाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी असेल.

**४. छाननी समितीचे अधिकार व कर्तव्ये.**—छाननी समिती पुढील अधिकारांचा वापर करील व कर्तव्ये पार पाडील :—

(क) आवश्यकतेनुसार बैठकांचे आयोजन करणे.

(ख) अधिनियमांतर्गत नेमून दिलेल्या अशा सर्व अधिकारांचा वापर करणे.

(ग) या अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत राहून, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांचे अनुपालन करणे.

(घ) तपासणी अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करणे.

**५. छाननी समितीशी संबंधित व्यक्ती.**— या अधिनियमाअंतर्गत छाननी समितीला, तिची कोणतीही कार्ये प्रभावीपणे पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी, तिला सल्ला देण्यासाठी किंवा तिच्यामार्फत कोणतेही काम करण्यासाठी विशेष ज्ञान किंवा अनुभव असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल.

**६. शिक्षणाधिकाऱ्याची कर्तव्ये.**— अधिनियमाअंतर्गत परवानगी देण्यात आलेल्या शाळांच्या कामकाजाबाबतचा अहवाल संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी हे संचालकांमार्फत, वेळोवेळी, शासनास सादर करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गो. शि. तुंगार,**
शासनाचे उप सचिव.

## SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya Annexe Building,
Mumbai 400 032, dated 20th April 2013.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SELF-FINANCED SCHOOLS (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2012.

No. SEF-2013/(67/13)/SE-1.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 23 read with sub-section (*3*) of section 6 of the Maharashtra Self Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 (Mah. I of 2013) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules, the same having been previously published as required by sub section (*1*) of section 23 of the said Act, namely :—

**1.** *Short title.*—These rules may be called the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) constitution of the scrutiny committees Rules, 2013.

**2.** *Definitions.*—(*1*) In these rules, unless the context otherwise requires,–

(*a*) "Act" means the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 (Mah. I of 2013) ;

(*b*) "Chairperson" means the Chairperson of the scrutiny committee ;

(*c*) " Deputy Director " means the Regional Deputy Director of the School Education Department ;

(*d*) "Deputy Education Officer" means the Deputy Education Officer of the District ;

(*e*) "Government" or "State Government" means the Government of Maharashtra ;

(*f*) "meeting" means a meeting of the scrutiny committee ;

(*g*) "member" means a member of the scrutiny committee including the Chairperson and the member secretary ;

(*h*) "member-secretary" means the member secretary of the scrutiny committee.

(*2*) The words and expressions used in these Rule but not defined shall have the meanings respectively assigned to them in the Act.

**3.** *Qualifications of the Chairperson and member.*—(*1*) The Chairperson of the scrutiny committee shall be Divisional Deputy Director of the Education and the Member Secretary shall be the Deputy Education Officer (Secondary).

(*2*) The members shall not be below the rank of Education Officer of the Education Department.

**4.** *Powers and duties of the scrutiny committee.*—The scrutiny committee shall exercise the following powers and perform duties, namely :—

(*a*) to hold meetings as and when required ;

(*b*) to exercise all such powers assigned under the Act ;

(*c*) to follow the directions given by the Government, from time to time, in consonance with the provisions of the Act ;

(*d*) to carry out scrutiny of the proposals received from inspecting officers.

**5.** *Association of persons with scrutiny committee.—(1)* The scrutiny committee may take assistance of any person possessing special knowledge or experience for advising it or attending to any work on its behalf for the purpose of efficient performance of any of its functions under the Act.

**6.** *Duties of the Education Officers.*—The Education Officer of the respective District shall submit the report of the functioning of the school to whom permission have been granted under the Act to the Government through Director, from time to time.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

G. S. TUNGAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

३००

**RNI No. MAHBIL /2009/37831**
**Reg. No. MH/MR/South-339/2011-13**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक २२(२)] शनिवार, एप्रिल २०, २०१३/चैत्र ३०, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० एप्रिल २०१३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२.**

क्रमांक स्वयंअ. २०१३/(६४/१३)/माशि-१.—महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) छाननी समित्यांची रचना नियम, २०१३ याचा नियम ३ यासह महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (२०१३ चा महा. १) याच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अधिनियमान्वये नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेची दर्जावाढ करण्यासाठी अर्जदारास द्यावयाच्या परवानगीबाबत विचारविनिमय करण्यासाठी व राज्य शासनाकडे शिफारस करण्यासाठी, प्रत्येक जिल्ह्याकरिता खाली विनिर्दिष्ट केलेले अध्यक्ष व सदस्य यांचा अंतर्भाव असणारी छाननी समिती घटित करीत आहे.—

**समितीची रचना**

| | |
|---|---|
| (१) संबंधित विभागाचा विभागीय शिक्षण उप संचालक | –अध्यक्ष |
| (२) संबंधित जिल्ह्याचा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | –सदस्य |
| (३) संबंधित जिल्ह्यासाठीच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचा प्राचार्य | –सदस्य |
| (४) संबंधित जिल्ह्याचा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | –सदस्य |
| (५) संबंधित जिल्ह्याचा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | –सदस्य-सचिव |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गो. शि. तुंगार,**
शासनाचे उप सचिव.

**SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 20th April 2013.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SELF-FINANCED SCHOOLS (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2012.

No. SEF. 2013/(64/13)/SE-1.—In exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 6 of the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 (Mah. I of 2013), read with rule 3 of the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Constitution of the Scrutiny committees Rules, 2013, the Government of Maharashtra hereby constitutes the scrutiny committee for each District consisting of the Chairperson and members specified below, for considering and recommending to the State Government the permission to be granted to the applicants for establishing a new school or upgrading the existing school under the said Act.—

**Composition of Committee**

| | | |
|---|---|---|
| 1. | Divisional Deputy Director of the Education of the concerned region. | .. Chairperson |
| 2. | Education Officer (Secodary) of the concerned District | .. Member |
| 3. | Principal of the District Institute of Education and Training for the concerned District. | .. Member |
| 4. | Education Officer (Primary) of the concerned District | .. Member |
| 5. | Deputy Education Officer (Secondary) of the concerned District. | .. Member-Secretary. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

G. S. TUNGAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक २२(३)] शनिवार, एप्रिल २०, २०१३/चैत्र ३०, शके १९३५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० एप्रिल २०१३

**आदेश**

**महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२.**

क्रमांक स्वयंअ. २०१३/प्र.क्र. ७९/१३/माशि-१.—महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (२०१३ चा महा. १) कलम ६, पोट-कलम (१) च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता महाराष्ट्र शासन छाननी समितीचा अहवाल उक्त अधिनियमातील कलम ६, पोट-कलम (१) अन्वये दिनांक ९ मे २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी राज्य शासनास सादर करण्याकरिता विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गो. शि. तुंगार,**
शासनाचे उप संचिव.

## SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 20th April 2013

### Order

MAHARASHTRA SELF-FINANCED SCHOOLS (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2012.

No. SEF-2013/79/13/SE-1.—In exercise of the powers conferred by the proviso to sub-section (*1*) of section 6 of the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 (Mah. I of 2013), for the academic year 2013-14, the Government of Maharashtra hereby specifies that the scrutiny committee shall submit the report under sub-section (*1*) of section 6 of said Act to the State Government on or before the 9th May 2013.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

G. S. TUNGAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.